नि.फौ.प्र.क.११२६/२०१७
सरकार वि. रिना +१
निशाणी क्रमांक - १३

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक -०१**

**मी शपथेवर खरे सांगते की,**

**माझे नाव :** सुशिला रामजी धुर्वे
वय - ३३ वर्षे, व्यवसाय-नोकरी, वाहतुक शाखा, अजनी, राह.महाल, नागपूर.

**सरतपासणी सरकारतर्फे सहायक सरकारी वकील सौ. पी.टी. धासकट यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

१) दि.०४.०४.२०१६ रोजी मी लकडगंज पोलीस स्टेशन येथे महिला पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होती. त्या दिवशी मी डयुटीवर असतांना वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गंगा जमुना परिसरात पेटोलींग करीता जाण्याचे आदेश दिले. त्यावेळी माझ्यासोबत पोलीस कॉन्स्टेबल वासुदेव, ए.पी.आय. मोले इत्यादी होते. आम्ही त्या ठिकाणी गेलो असता एक महिला रस्त्याच्या कडेला उभी राहून हातवारे करुन येणा-या जाणा-या पुरुषांना आकर्षित करीत होती. आम्ही तिला ताब्यात घेतले. तिला तिचे नांव विचारले असता तिने तिचे नांव रिना धनावत असल्याचे सांगितले. तिने मुन्नीबाई कालखोर हिच्या घरी ती देहव्यापार करते असे सांगितले. तिच्या ताब्यातून कोणतीही मौल्यवान वस्तु मिळून आली नाही. एपी.आय. मोले यांनी आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. तपासा दरम्यान माझा जबाब नोंदविण्यात आला. आरोपी रिना धनावत हिला दाखविल्यास मी तिला ओळखू शकते. आज कोर्टात हजर असलेली आरोपी ही मुन्नीबाई कालखोर आहे.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एन.एन. राउत.**

२) हे म्हणने खरे आहे की, गंगा जमुना परिसरात पोलीस

चौकी आहे व गंगा जमुना परिसरात पोलीस नेहमी गस्त देत असतात. ज्या व्यक्तींना हातवारे करुन आरोपी आकर्षित करीत होती त्या व्यक्तीने पोलीस स्टेशनला तक्रार दिली नव्हती. हे म्हणने खरे नाही की, आरोपी रस्त्याच्या कडेला उभी राहून कधीही हातवारे करुन लोकांना आकर्षित करीत नव्हती. हे म्हणने खरे नाही की, मी घ टनास्थळी नव्हते व माझा जबाब नोंदविला नाही. हे म्हणने खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेरतपास-काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

(ए.पी. गिरडकर)
१६ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

नागपूर.
दि.१४.११.२०२२.

नि.फौ.प्र.क.११२६/२०१७
सरकार वि. रिना +१
निशाणी कमांक - १३

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word same as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik